# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in


## अधिसूचना (प्रारुप)

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र. मविनिआ/लिगल/२०१८/----** : विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १२७ सह कलम १८१च्या उप-कलम (२) खंड (zo) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाया अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन आणि पूर्व प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपध्दती) विनियम, २००४' ('मुख्य विनियम') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

**१ संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ**

(१) या विनियमांस "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपध्दती) (पहिली सुधारणा) विनियम, २०१८" असे म्हणावे.

(२) हे विनियम ते ज्या तारखेस शासकीय राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या अनुसूचीमध्ये सुधारणा**

मुख्य विनियमांच्या अनुसूचीमधील अनु.क्र. ९, १० आणि ११, म्हणजेच, अपिलाचा नमुना (विनियम ३(२)) खालीलप्रमाणे आहे :

*"९. निर्धारित देयकाच्या संदर्भात अपीलात जात असल्याचे परवानेधारक विद्युत कंपनीला कळविल्यानंतर १/३ रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाने केलेली मागणीची तारीख*

*१०. परवानेधारक विद्युत कंपनीने १/३ रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाकडे केलेल्या मागणीची तारीख*

*११. परवानेधारक विद्युत कंपनीने १/३ रकमेच्या प्रदानासाठी केलेली मागणी ग्राहकास मिळाल्याची तारीख"*

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :

> *"९. निर्धारित देयकाच्या संदर्भात अपीलात जात असल्याचे परवानेधारक विद्युत कंपनीला लेखी स्वरुपात कळविल्यानंतर अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाने केलेली मागणीची तारीख*
>
> *१०. परवानेधारक विद्युत कंपनीने अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी ग्राहकाकडे केलेल्या मागणीची तारीख*
>
> *१२. परवानेधारक विद्युत कंपनीने अर्ध्या रकमेच्या प्रदानासाठी केलेली मागणी ग्राहकास मिळाल्याची तारीख"*

२.२ मुख्य विनियमांच्या अनुसूचीमधील अनु. क्र. ४ म्हणजेच, "विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२७ खाली अपील" खालीलप्रमाणे आहे :

> "४. विद्युत अधिनियम, २००३ कलम १२७ (२) अनुसार अपीलदाराने परवानेधारक विद्युत कंपनीला निर्धारित रकमेच्या एक-तृतियांश रक्कम रु. __________ रोखीने/ क्र. ___________ तारीख ___________च्या डिमांड ड्राफ्टने प्रदान केली आहे.
>
> अपीलाबरोबर या रकमेच्या प्रदानाचा कागदोपत्री पुरावा जोडण्यात आला आहे."

यामध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येईल :

> "४. विद्युत अधिनियम, २००३ कलम १२७ (२) अनुसार अपीलदाराने परवानेधारक विद्युत कंपनीला निर्धारित रकमेच्या अर्धी रक्कम रु. __________ रोखीने/ क्र. ___________ तारीख ___________च्या डिमांड ड्राफ्टने प्रदान केली आहे.
>
> अपीलाबरोबर या रकमेच्या प्रदानाचा कागदोपत्री पुरावा जोडण्यात आला आहे."

**सचिव,**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई,**

**-- जून, २०१८**

---

**सूचना**: "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अपील प्राधिकारी यांचे समोर अपील दाखल करण्याची कार्यपध्दती) विनियम, २००४"", शासकीय राजपत्रात दिनांक १० जून, २००४ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.